शोधपत्र-मराठी

March, 2010

# १९५० ते १९७५ या कालखंडातील मराठी नाटकांची चिकित्सा

* प्रा. डॉ. माधव बसवंते

*मराठी विभाग, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नादेड

**प्रास्ताविक**

लोकरंजन आणि समाज प्रबोधनासाठी प्राचीन काळापासून नाटकाचा आधार घेतला गेला आहे. म्हणून नाटक या कलाप्रकाराला मानवी जीवनाचा आरसा असे संबोधले जाते. मानवी जीवनातील रुढी परंपरेबरोबरच विविध घटना चालीरीती यांचे प्रतिबिंब नाटकात दिसून येते. नाटक ही केवळ सादरीकरणाची कला नसून एक वाङ्मय प्रकार आहे हे आपल्या लक्षात येते. स्वातत्र्यपूर्व काळातील नाटक हे प्रामुख्याने स्वातंत्र्यप्राप्ती, सामाजिक परिवर्तनाबरोबरच जिद्द व त्यागाने परिपूर्ण होते. दृक, श्राव्य व काव्य या तीन प्रकारात प्रेक्षकांना मराठी नाटक पहावयास मिळते.

या नाटकाच्या माध्यमांतून तत्कालीन परिस्थितीबरोबरच लोकस्वभावांचे दर्शनही प्रेक्षकांना होते. म्हणून मराठी नाटक हे दृक व श्राव्य स्वरुपाच्या वाङ्मय प्रकारात दिसून येते. नाटक आशयानुसार पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, दलित व स्त्रीवादी अशा वर्गीकरणात दिसून येते. नाटकाची जी लिखित संहिता असते त्या संहितेला मराठी वाङ्मयात महत्व आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीची भिती असल्यामुळे मराठी नाटकात निर्भयपणा दिसून येत नाही. परंतू स्वातंत्र्यानंतर मराठी नाटकात निर्भयपणा प्राप्त झाला. अशा नाट्य वाङ्मय प्रकारात समग्र मानवी जीवनाचे भाष्य दिसून येते.

नाटकाच्या सादरीकरणात अभिनयाबरोबरच शब्दालाही महत्व आहे. तसेच दिग्दर्शन कलावंतांचा अभिनय, नाट्यसंकेताचा वापर, वातावरण आणि संवाद या नाट्यघटकांना महत्वाचे स्थान असते. नाटक हा वाङ्मय प्रकार असला तरी तो मूलत: केवळ सादरीकणासाठी लेखन केले जाते. लोककलाप्रकारात या नाट्य वाङ्मयाची बीजे दिसून येतात. संवाद हे नाटकाचे शरीर असते तर मध्यवर्ती सूत्र हे संवादाचा आत्मा असतो. नाट्यलेखन करण्यापूर्वी लेखकाला नाटकाच्या घटनांचा सर्वांगीण विचार करावा लागतो.

**नाटक म्हणजे काय ?**

नाटकाला इंग्रजीत Drama म्हणतात. मूळ ग्रीक शब्द Dram या शब्दावरुन Drama हा शब्द रुढ झाला. Dran म्हणजे कृती करणे, ही कृती दोन प्रकारची असते. नाटकातील पात्रे ही स्वत: कृती करतात. मनोरंजन हे नाटकाचे आकर्षण असते. त्याचबरोबर जीवनदर्शन, रंजन आणि बोध या तिन्ही पातळ्या नाटकात एकजीव झालेल्या असतात. नाटकाचे सादरीकरण करणाऱ्यांना 'नट' म्हणतात. नट हा शब्द मूळ प्राकृत भाषेतला आहे. संस्कृत भाषेतील 'नर्त' या शब्दाचा तो अपभ्रंश आहे.

नर्तक म्हणजे नाचणारा. म्हणून एका मानवी समूहाने दुसऱ्या मानवी समूहासमोर सादर करावयाची कला म्हणजे नाटक होय. नाटक म्हणजे शब्दांपासून तयार होणारी संहिता आणि या संहितेचे सादरीकरण म्हणजे नाटक होय.

या नाटकाचे सादरीकरण नेपथ्य, संगीत, प्रकाश योजना व अभिनय यांसारख्या अनेक घटकांच्या मदतीने करता येते. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत सिसिरो यांच्या मते "नाटक हे जीवनाचे अनुकरण आहे. चालीरीतीचा आरसा व सत्याचे प्रतिबिंब आहे." डॉ. भालचंद्र फाडके यांनी 'नाटक हा मानवी मनाचा सांस्कृतिक उद्‌गार आहे' असे म्हटले आहे. भरतमूनींनी नाटकाचा सर्वांगीण विचार करतांना नाटकाची खालीलप्रमाणे व्याख्या केली आहे.

**नानाभावो संपन्न नानावस्थान्तरात्मकम् ।**
**लोकवृत्तानूकरणं नाट्यमेतन्मया कृतम् ॥**

लोकनाट्य हे गर्दीसाठी असते असे ना.सी. फडके यांनी म्हटले आहे. विल्यम अर्थर यांच्या मतानूसार "नाटक हे आपल्याला कमीपणा आणणाऱ्या व बंधन घालणाऱ्या दैवीशक्ती व निसर्ग यांच्या संघर्षात सापडलेल्या माणसाच्या इच्छेचे प्रतिनिधीत्व करते".

एकंदरीत समूहाने समूहासमोर करावयाची कला अशी सर्वसमावेशक नाटकाची व्याख्या केली जाते. म्हणून नाटक हे मानवी चळवळीतील परिवर्तन, प्रबोधन, लोकजागृती, लोकरंजन, ज्ञान, लोकस्वभाव व संघर्षाच्या हत्याराचे प्रतिबिंब नाटकातून दिसून येते.

आधुनिक मराठी नाटकाची सुरुवात विष्णूदास भावे यांच्यापासून झाली असली तरी या विषयी संशोधक व विचारवंतामध्ये एकमत दिसून येत नाही. मात्र मराठी आधुनिक नाटकाचा विकास हा इंग्रजी नाटकांच्या अनुकरणातून झालेला आहे. मराठी नाटकाने इंग्रजी नाटकाचे अनुकरण केले आहे हे आपणास नाकारता येणार

नाही.

**नाटकाचे घटक व रचना**

नाटक लिहिण्याचे आणि ते रंगभूमीवर सादर करण्याचे एक तंत्र असते. आशयात्मक दृष्टीने नाट्यसृष्टीचा विचार करता जीवनातल्या वास्तवाचे चित्रण नाटकाच्या माध्यमातून मराठी रंगभूमीवर सादर केले जाते. नाट्यतंत्राच्या दृष्टीने मराठी नाटकाने संस्कृत रंगभूमीचे अनुकरण केले आहे.

मराठी नाटकांच्या घटकांचा विचार करता, विषयसूत्र, संविधानक, पात्रचित्रण, संवाद, वातावरण निर्मिती यांचा विचार करावा लागतो. नाटकाचे विषयसूत्र म्हणजे एक मध्यवर्ती संघर्ष असतो. संघर्ष हा नाटकाचा आत्मा असतो असे म्हटले जाते. नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनात नकळतपणे रुजवलेला एखादा दृष्टिकोण हे नाटकाचे विषयसूत्र असते. तसेच नाटकाचे मध्यवर्ती सूत्र हे नाटकाच्या बांधणीवरही परिणाम करणारे असते.

नाटकाचा दुसरा घटक म्हणजे संविधानक हा होय. संविधानक म्हणजे कथानकाची सहेतूक मांडणी होय. नाटकात कथानक स्पष्ट करण्यासाठी लेखकाजवळ संवादाशिवाय अन्य पर्याय नसतो, म्हणून कार्यकारणभाव सूसंगत दृष्ट्या कथानकाची मांडणी केली जाते. समस्या प्रारंभ, पेचप्रसंग व सोडवणूक हे या संविधानकाचे तीन कल्पीत टप्पे सांगितले जातात. मात्र पाश्चात्य समीक्षक या संविधानकाच्या टप्याऐवजी पाच प्रसंग मानतात.

पात्रचित्रण हा नाटकाचा तिसरा घटक असून इ.स. १९८० नंतर मराठी नाटकामध्ये पात्रचित्रणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संवाद हे नाटकाचा चौथा घटक आहे. संवाद हे नाटकाचे शरीर असून, मध्यवर्ती सूत्र या संवादाचा आत्मा असतो. संवाद आणि मध्यवर्ती सूत्र यांच्यामध्ये सूसंगतपणा असल्याशिवाय नाटकातील संवाद अर्थपूर्ण होत नसतात.

नाटकातील पात्रांच्या व्यक्तिमत्वाचे आविष्कार संवादातून स्पष्ट होत असतात. वातावरण निर्मिती हाही नाटकाचा एक महत्वपूर्ण घटक असून या घटकाच्या माध्यमातून नाटकाची प्रयोगक्षम बाजू दिग्दर्शित केली जाते. वातावरण निर्मितीसाठी नेपश्य, प्रकाश व संगीत यांचा प्रभावीपणे वापर केला जातो.

**नाटकाची तंत्रे**

नाट्यतंत्रात सूत्रधार, सोंगाड्या, बतावणी, स्वगत, निवेदक, नेपथ्य, संगीत, प्रकाश योजना व रंगभूषा यांचा उल्लेख करावा लागतो. सूत्रधारापासूनच नाट्यप्रयोगाचा प्रारंभ होतो. सांगाड्या आणि बतावणी या तंत्राचा वापर नाटकात झाला असेल तर नाटकाचा बाज तमाशाचा असतो. रंगभूमीवरील जी पात्रे स्वत:शी बोलतात अशा त्या संभाषणाला स्वगत म्हणतात.

नाटकातील प्रसंगात आणि व्यक्तिचित्रणामध्ये अनावश्यक तपशील रद्द करण्यासाठी एक नाट्य संकेत म्हणून नाटकात निवेदकाची भूमिका आली आहे. रंगभूमीवरील वस्तू आणि अवकाश यांच्या निर्मितीवरील वस्तू आणि अवकाश यांच्या निर्मितीतून अभिनयाचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या योजनेस नेपथ्य म्हणावे असे यूरोपियन नाट्यसमीक्षकानी म्हटले आहे. नाटकातील मध्यवर्ती आशय प्रभावीपणे प्रेक्षकांच्या मनावर बिंबविण्यासाठी नाट्यतंत्राकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

**१९५० ते १९७५ कालखंडातील नाटक**

सन १९५० ते १९६० या दशकातील मराठी नाटकांचा विचार करता भारतावर असलेली ब्रिटीशांची राजवट, भारताची फाळणी, हिंदू व मुस्लिम यांची दुभंगलेली मने, भारतीय राज्यघटनेची अमलबजावणी. भांडवलदार वर्ग आणि मजूर यांच्यातील संघर्ष यासारख्या प्रमुख विषयाबरोबरच सामाजिक व राजकीय प्रश्नांना वाचा फोडणारी नाटके मराठी रंगभूमीवर सादर झाली.

या दशकातील जीवाशिवाची भेट, भ्रमाचा भोपळा, जयमल्हार, देवमाणूस, अंमलदार, आम्ही आहोत बायका, मला निवडून द्या, दुरितांचे तिमीर जाओ, युगयात्रा, वेड्यांचे घर उन्हात, तूझे आहे तूझ्यापाशी, जे का रंजले गांजले इत्यादी प्रमुख नाटकांचा उल्लेख करावा लागेल.

या दशकाच्या नाट्यलेखनात नाट्यलेखकांनी समाजातील विविध विषयावर प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे. या काळात पोटासाठी धडपड करणारा माणूस व स्त्री विक्री करण्यात गुंतल्याचे चित्रण मराठी नाटकातून दिसून येते. त्याबरोबरच कामगारांच्या हितासाठी लढा देणाऱ्या कामगार नेत्यांची शोकांतिका, देशाच्या स्वातंत्र्यासाठी भारतीय क्रान्तिकारकांचे हौतात्म्य, तत्कालिन व्यवस्थेतील भ्रष्टाचार, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या वधानंतर ब्राम्हणावर झालेले अन्याय अत्याचार इत्यादी विषय या दशकातील मराठी नाटकातून प्रतिबिंबित होतात. सन १९५० ते १९६० या दशकात साधारणत: १२८ च्या आसपास मराठी नाटके रंगभूमीवर सादर झालेली आहेत.

सन १९६० नंतर मराठी रंगभूमीवर आधुनिकतेबरोबरच दलित नाटकांनी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. घोटभर पाण्यासाठी व्याकूळ होणाऱ्या दलित समाजाच्या कंठात सारा समुद्र पिऊन टाकण्याची जिद्द ज्या महामानवाने निर्माण केली त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आणि लढ्यांचा प्राणवायू छातीत घेऊन दलित रंगभूमी जोमाने पूढे आली. सन १९६१-७० या दशकात साधारणत: २०५ इतकी मराठी नाटके रंगभूमीवर सादर झाली. या दशकातील नाटकांचा विचार करता प्रामुख्याने प्रेमा तूझा रंग कसा, कायापालट, तिसरा बाजीराव, तो मी नव्हेच, मोरुची मावशी, मंदारमाला, जिद्द, एका ओल्या रात्री, धर्म, गारंभीचा बापू, एक शून्य बाजीराव, संगीत सौभद्र, शांतता कोर्ट चालू आहे, हा खेळ सावल्यांचा, कट्यार काळजात घुसली, मला काही सांगायचंय, चक्रव्यूह, बीज म्हणाली धरतीला इत्यादी प्रमुख नाटकांचा उल्लेख करवा लागेल. या दशकातील नाटयलेखनात दलित नाट्यलेखनाबरोबरच सांसरीक जीवनाचे वेगवेगळे पैलू, संशयामुळे संसाराचा झालेला नाश तसेच काही नाट्यकृतीतून तत्कालीन सामाजिक, कौटुंबिक व ऐतिहासिक अशा अनेक परिस्थितीचे दर्शन नाटकातून दिसून येते. काही नाटकातून

स्त्रीचारित्र्यावर उडविले जाणारे शिंतोडे याचेही दर्शन मराठी नाटकांतून होते.

सन १९७० नंतर मराठी नाटकांच्या जडणघडणीमध्ये व्यावसायिक रंगभूमीचा वाटा असल्याचे दिसून येते. तसेच इतर कालखंडाच्या मानाने १९७० नंतरच्या कालखंडात अधिक प्रमाणावर नाटके प्रकाशित होऊन रंगभूमीवर आली आहेत. स्वातंत्र्यानंतर वाढते औद्योगिकरण, लैंगिक वासना, राजकीय पक्षातील ढवळाढवळ आणि भ्रष्टाचार, लोकसंख्यावाढ, बेकारी, युद्ध यासारख्या विषयावर आधारीत नाटके मराठी रंगभूमीवर सादर झाली आहेत. सन १९७१-७५ या कालखंडात साधारणतः १६२ नाटके व एकांकीका प्रकाशित झाल्याचे दिसून येते. यातील प्रमुख नाट्यकृतीचा विचार करता मीरा-मधुरा, चेहरे आणि मुखवटे, नटसम्राट, काँग्रेसचे रुप कसे असावे, निवडणूक, पूत्र मानवाचा, ययाती, विकत घेतला न्याय, एकलव्य, घाशीराम कोतवाल, सम्राटसिंह, महानिर्वाण, विषवृक्षाची छाया या प्रमुख नाटकांचा उल्लेख करावा लागेल.

**निष्कर्ष**

१) नाटक हा एक वाङ्मय प्रकार असून ते मूलतः सादरीकरणासाठी लिहिला जातो.

२) युरोपीयन रंगभूमीच्या अनुकरणातून मराठी नाटक सुरु झाले.

३) नाटकात जे वास्तव दाखवावयाचे असते तो अखेरीस वास्तवाचा आभास असतो.

४) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वैयक्तिक स्वार्थाचा उसळलेला आगडोंब यांचे समग्र दर्शन मराठी नाटकात दिसून येते.

५) आदर्श लोकशाही कशी असावी ? याचेही दर्शन मराठी नाटकातून घडविले आहे.

६) सन १९६० नंतर राजकीय व्यक्तीच्या मनातील देशभक्तिची भावना कमी होऊन त्यांच्यात अहंकाराची भावना निर्माण झाल्याचे मराठी नाटकातून दिसून येते.

७) सन १९७० नंतर देशात वाढणारी सुशिक्षितांची बेकारी आणि खेड्यातील दारिद्र्य व लोकसंख्येचा वाढता भस्मासूर याचेही प्रतिबिंब नाटकात उमटले आहे.

८) भारताची फाळणी व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा वध या भीषण घटनेवर फारशी मराठी नाट्यनिर्मिती झालेली नाही.

९) सन १९६० ते १९७५ या कालखंडात अनेक नाट्यनिर्मिती झाली, असली तरी ती मनोरंजनावर आधारलेली आहेत असे दिसून येते.

१०) सन १९७२ साली महाराष्ट्रात पडलेला भीषण दुष्काळ यामुळे या कालखंडातील नष्ट झालेली नीतिमत्ता, स्वातंत्र्यानंतर वाढलेला भ्रष्टाचार, शासनाची उदासीनता आणि राजकीय ढोंगबाजी या विषयावर फारशी नाट्यनिर्मिती झालेली नाही.

११) विषयसूत्र, संविधानक, पात्र चित्रण, वातावरण निर्मिती हे नाटकाचे घटक आहेत.

१२) इ.स. १९८० नंतर मराठी नाटकामध्ये पात्रचित्रणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) डॉ. मेदककर प्रकाश, नाटक : लोक आणि लौकिक. २) केळकर गोदावरी, भारतीय नाट्यशास्त्र. ३) प्रा. भगत दत्ता, नाटक ४) डॉ. सपकाळ अनिल, नाटक : आकलन आणि आस्वाद ५) शिंदे विश्वनाथ, स्मार्त हिमांशू : मराठी नाटक आणि रंगभूमी. ६) प्रा. पठाण आमजत मुनीरखाँ : १९५० ते २००० या कालखंडातील नाटकांचा चिकित्सक अभ्यास (अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध) ७) डॉ. देशपांडे वि.भा : स्वातंत्र्योत्तर मराठी नाटक